# प्रकरण दोन

## मूल्य आणि शिक्षण परस्पर संबंध

२.१ प्रास्ताविक

२.२ मूल्य म्हणजे काय ?

२.३ मूल्य आणि शिक्षण

२.४ मूल्यशिक्षणात शिक्षकाची भूमिका

२.५ मूल्यविकसनाचे दृष्टीने मातृभाषेचे अध्यापन

२.६ समारोप

## २.१ प्रास्ताविक :

प्रस्तुत संशोधनाचा विषय ' उच्च माध्यमिक स्तरावरील मराठीच्या पाठ्यपुस्तकांच्या अध्यापनाचा मूल्यशिक्षणाच्या संदर्भात चिकित्सक अभ्यास ' हा आहे. प्रस्तुतच्या संशोधनासाठी सैध्दान्तिक पार्श्वभूमी म्हणून मूल्य म्हणजे काय ?, मूल्यांचे विविध प्रकार, मूल्यांचे मानवी जीवनातील महत्व, मूल्यशिक्षणात शिक्षकाची भूमिका व मूल्यविकसनाचे दृष्टीने मातृभाषेचे अध्यापन या मुद्यांविषयी माहिती असणे आवश्यक आहे. सबब या प्रकरणात या मुद्यांचा परामर्श घेतलेला आहे.

## २.२ मूल्य म्हणजे काय ?

मूल्य आणि शिक्षण यांचा परस्पर संबंध पहाण्यापूर्वी मूल्य म्हणजे काय ? हे प्रथम जाणून घ्यावे लागेल.

' मूल्य ' या शब्दाला इंग्रजीमध्ये 'Value' असा प्रतिशब्द आहे. 'Value' या संज्ञेचा अर्थ खालीलप्रमाणे आहे.

"Belief about what is desirable or undesirable, values reflect the culture of society and if the individual accepts a value for him/herself it may become a goal."[1]

या वरून असे स्पष्ट होते की, व्यक्तीची श्रध्दास्थाने ही सामाजिक संस्कृतीतून निश्चित होत असतात. मूल्यशिक्षणात अशा श्रध्दास्थानांना व आदर्शांना अतिशय महत्व असते. श्रध्दा सदाचाराला प्रेरक ठरतात तशाच त्या अनाचारी प्रवृत्तींना आळाही घालतात.

आदर्शांच्या संदर्भात श्री. मे.पु. रेगे म्हणतात -

' एक व्यक्ती म्हणून स्वत:ची गुणवत्ता काय आहे है मापण्याचा मानदंड आदर्शांच्या रूपाने आपल्याला लाभत असतो. नियमांच्या आणि सामाजिक भूमिकांच्या पलीकडे जाणाऱ्या आणि आपल्या व्यक्तिमत्वाच्या गाभ्यात परिवर्तन करू शकणाऱ्या आंतरिक मूल्यांची कल्पना अशा आदर्शांवर आधारलेली असते.'[2]

' मूल्य ' या संज्ञेचे स्पष्टीकरण एका अहवालात असे आढळते -

"The word value as understood in the context of educational philosophy refer to those desirable ideals and goals which are intrinsic in themselves and which, when achieved or attempted to be achieved, evoke a deep sense of fulfilment to one or many or all parts of what we consider to be the highest elements of our nature....

There is a common understanding among all of us as to what we mean when it is said that Truth, Beauty and Goodness are the supreme values of life. They are intrinsic in character and they are ends in themselves. They are considered to be the most desirable ideals and they occur to us whenever we try to conceive of those states of our being or becoming in which we are likely to find some kind of ultimate fulfilment."[3]

सदर स्पष्टीकरणाचे मराठीतील भाषांतर डॉ. रा.मा.देवस्थळी यांच्या ' विद्यार्थी मित्रांनो ' या पुस्तकात पुढीलप्रमाणे आढळते -

" शैक्षणिक तत्वज्ञानाच्या संदर्भात ' मूल्य ' हा संज्ञेने स्वयंसिध्द आणि इष्ट अशा ध्येयांचा आणि आदर्शांचा निर्देश केला जातो. ही ध्येये किंवा आदर्श साध्य झाली असता किंवा साध्य करण्याच्या प्रयत्नात-देखील आपल्या स्वभावातील आपल्याला अत्युच्च वाटणाऱ्या गोष्टींच्या परिपूर्तेची सखोल अशी जाणीव जागृत करतात. सत्य, शिव आणि सौंदर्य ही जीवनाची सर्वोच्च मूल्ये आहेत असे म्हटले जाते. त्या वेळेला त्याचा नेमका अर्थ काय असतो याविषयी आपल्या सर्वांच्यातच साधारण अशी एक समजूत असते, ही मूल्ये मूलत:च स्वयंसिध्द असून साध्याच्या स्वरूपात असतात. ती अत्यंत इष्ट अशी ध्येये वा आदर्श वा साध्ये मानली जातात. ज्यावेळी आपण सद्य:स्थितीतील वा भावी कालातील अशा अवस्थांची कल्पना करतो की ज्यामुळे आपल्याला सर्वोच्च परिपूर्तता लाभेल असे वाटते, त्यावेळी आपल्याला या साध्यांचा वा आदर्शांचा बोध होतो."[४]

यावरून असे म्हणता येईल की, प्रत्येक समाजाचे त्याचप्रमाणे त्या समाजातील व्यक्तीचे काही आदर्श असतात, काही ध्येये असतात. त्यांना त्या समाजाची मूल्ये असे म्हणता येईल.

" ' मूल्य ' हा शब्द आपल्या मनोधारणेची विशिष्ट स्थिती वा घडण दाखवितो "[५] असे दि.ह. सहस्त्रबुध्दे यांना वाटते. या विशिष्ट मन:स्थितीमुळे वा घडणीमुळे माणसाचे विशिष्ट वर्तन घडते. या मूल्यांचे प्रगटीकरण म्हणजेच व्यक्तीचे गुण होत. उदा. ' सत्य ' हे ' मूल्य ' आहे. पण राम सत्यवचनी होता म्हणजे त्याच्या मनाची घडणच सत्य बोलण्याची होती.

" सत्य, शिव व सुंदर याकडे असणारा मनाचा कल म्हणजे मूल्य असा स्थूलमानाने अर्थ मानणे चुकीचे ठरणार नाही,"[६] असे प्राचार्या श्रीमती लीला पाटील यांना वाटते. तसेच " नैतिक, बौध्दिक अथवा सौंदर्यविषयक

दृष्टिकोनातून आपल्याला ज्याबद्दलची पसंती जाणवते त्यालाच ' मूल्य ' म्हणता येईल.[१७] असेही त्या म्हणतात. या पसंतीमुळेच व्यक्ती ते मूल्य स्वत: कार्यवाहीत आणण्याचा अथवा इतरांकडून कार्यवाहीत आणण्याचा प्रयत्न करीत असते. असलेल्या विविध पर्यायांमधून आणि त्या पर्यायांचा तरतमभावाने विचार करून आपण मूल्य स्वीकारतो. अमूक मूल्य मी स्वीकारले आहे असे उघडपणे सांगतो. एवढेच नव्हे तर त्या मूल्याप्रमाणे आपण आपल्या वर्तनाला दिशाही देतो. थोडक्यात म्हणजे आपण स्वीकारलेली मूल्ये जणू आपल्या जीवनाचे सुकाणू.

मूल्यांच्या संदर्भात मानवीमूल्ये, जीवनमूल्ये, मूलभूत मूल्ये, शाश्वत मूल्ये, धार्मिक मूल्ये, आर्थिक मूल्ये, सामाजिक मूल्ये, सौंदर्यविषयक मूल्ये असे विविध शब्दप्रयोग आढळतात. मूल्यांकडे पाहाण्याच्या भिन्न दृष्टिकोनामुळे ही भिन्न नावे पडली आहेत.

अनेक धर्मशास्त्रांमध्ये ठिकठिकाणी यम नियमाखाली येणाऱ्या गुणांची यादी करण्याचा प्रयत्न केलेला आढळतो. श्रीमत् भगवत् गीतेमध्ये तेराव्या अध्यायात - अभिमानाचा अभाव, दंभ नसणे, अहिंसा, क्षमाशीलता, वागणुकीत सरळपणा, गुरुसेवा, शुचिर्भूतपणा, स्थैर्य, मनोनिग्रह, इंद्रियांच्या ठिकाणी विरक्त, निरहंकारवृत्ती, जन्म-मरण-वार्धक्य व रोग हे आपल्यामागे लागलेले दोष आहेत अशी बुध्दी असणे, अनासक्ती, स्त्री-पुत्र-गृह इत्यादिकांत लंपट नसणे, इष्ट किंवा अनिष्ट प्राप्त झाले तरी नेहमी चित्ताची समता, अनन्यभावाची अढळ भक्ती, अध्यात्म ज्ञान नित्य आहे अशी बुध्दी असणे व तत्वज्ञानाच्या सिध्दांताचे परिशिलन अशी १८ गुणांची यादी दिली असून हे सर्व गुण मुख्यत: व्यक्तीचा उत्कर्ष साधणारे आहेत.

तर १६ व्या अध्यायात - निर्भयता, पूर्ण सात्विक वृत्ती, ज्ञान व कर्मयोग या दोहोंविषयी तत्परता, दान, इंद्रियनिग्रह, यज्ञ, स्वधर्माप्रमाणे आचार, तप, सरळपणा, अहिंसा, सत्य, क्रोध नसणे, त्याग, शांती, मनात

दुष्ट बुध्दी न बाळगणे, प्राणीमात्राविषयी दया, निर्लोभता, नम्रता, जनलज्जा (वाईट कृत्याची) तेजस्विता, क्षमा, धृति, शुचिर्भूतपणा, कोणाचाही द्रोह न करणे, अभिमान नसणे हे सद्गुण प्रकर्षाने समाज कल्याणात उपयोगी ठरणारे आहेत.

बौध्द धर्मातील अष्टपदीमध्ये दर्शन, विचार, वाणी, कृती, व्यवसाय, दैनंदिन जीवन, जीवनाचे ध्येय यामध्ये शुध्दता राखणे व शेवटी व्यक्तीतील अंतरात्मा दिव्यत्वाशी सुसंवादी राहील या दृष्टीने प्रयत्नशील राहाणे यावर भर देण्यात आलेला आहे.

अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह या मूल्यांविषयी बौध्द व जैन या दोन्ही धर्मांनी आग्रह धरला आहे.

पारशी धर्मामध्ये दानधर्म करणे, दीनदुबळ्यांची सेवा करणे, स्वार्थत्याग यावर भर देण्यात आला असून चांगले आचार यातूनच सर्व शक्तिमान परमेश्वराच्या निकट माणूस पोचतो असे म्हटले आहे.

ख्रिश्चन धर्मातील १० आदेश ( Ten Commandments ) असत्य बोलू नये, दुसऱ्याची गोष्ट मिळण्याची इच्छा करू नये, क्षमा, प्रेम, दान, सेवा, स्वार्थत्याग, करुणा, भूतदया, सहानुभूती या सद्गुणांचा विकास करावा असे आहेत.

इस्लाम धर्मामध्ये ईश्वराच्या सर्वसाक्षीपणावर विश्वास, नियमितपणे व दररोज प्रार्थना करणे, आपल्या उत्पन्नातून ठराविक हिस्सा सार्वजनिक हितासाठी देणे, धर्मस्थळांची (मक्का, मदिना) यात्रा करणे, उपवास व संयम पाळणे, प्राणीमात्रांच्या कल्याणासाठी प्रयत्न करणे हे ईश्वरप्राप्तीचे मार्ग सांगितले आहेत.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

महात्माजींनी आपल्या दैनंदिन प्रार्थनेमध्ये खालील अकरा सद्गुणांचा अंतर्भाव केला होता :

> अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य, असंग्रह, शरीरश्रम,
> अस्वाद, सर्वत्र भयवर्जन, सर्वधर्मसमानत्व, स्वदेशी,
> स्पर्शभावना ही एकादश सेवावी नम्रत्वे दृढ निश्चये ।

औरंगाबाद येथे झालेल्या राज्यस्तरीय नैतिक शिक्षणविषयक चर्चासत्रात माध्यमिक शालेय स्तरासाठी पुरस्कारिलेल्या मूल्यांची यादी व त्यांची कार्यात्मक व्याख्या पुढीलप्रमाणे आहे.[8]

| मूल्य | कार्यात्मक व्याख्या |
|---|---|
| १) स्वच्छता | स्वत:चे शरीर व स्वत:च्या नेहमीच्या वापरात येणाऱ्या वस्तू आणि समोवतालचा परिसर स्वच्छ ठेवण्याची तत्परता व कृतिशीलता दैनंदिन वर्तनात सातत्याने दाखविणे म्हणजे स्वच्छता होय. |
| २) शुचिता | आपल्या मनातील वाईट विचार काढून टाकून, मन शुध्द करणे म्हणजे शुचिता होय. |
| ३) निर्भयता | विवेकाला पटलेल्या गोष्टी, परिणामाची किंवा टीकेची पर्वा न करता, स्पष्टपणे मांडणे. त्या प्रत्यक्षात आणणे म्हणजे निर्भयता होय. |
| ४) स्वावलंबन | दैनंदिन व्यवहारातील स्वत:ची जी कामे स्वत: करण्यासारखी आहेत ती कामे स्वत: सातत्याने करणे म्हणजे स्वावलंबन होय. |
| ५) श्रमनिष्ठा | कोणतेही शारीरिक श्रम किंवा कष्टाचे काम, हे कमी दर्जाचे न मानता, स्वच्छेने व उत्स्फूर्तपणे ते करण्याची तयारी असणे म्हणजे श्रमनिष्ठा. |

| मूल्य | कार्यात्मक व्याख्या |
| --- | --- |
| ६) विज्ञाननिष्ठा | त्याज्य रूढी, अनिष्ट परंपरा आणि अंधविश्वास यांचे दडपण न स्वीकारता विचारात व आचारात वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे म्हणजे विज्ञाननिष्ठा होय. |
| ७) आदरभाव | सर्व धर्मांतील व सर्व मानवी समूहातील श्रेष्ठ व ज्ञानी व्यक्ती, कलाकार, शास्त्रज्ञ इत्यादींचे मोठेपण मान्य करणे व वाणी, विचार, आचार यांतून प्रकट करणे म्हणजे आदरभाव होय. |
| ८) कर्तव्यदक्षता | परिसरातील सार्वजनिक मालमत्ता, वस्तु, प्राणिमात्र व इतर व्यक्ती, यांच्याशी असलेले आपले नाते हितकर व्हावे यासाठी तत्परतेने कृती करणे म्हणजे कर्तव्य-दक्षता होय. |
| ९) बंधुता | आपल्या भावाबहिणींसंबंधी वाटणारी आत्मियता इतरेजनांसंबंधी बाळगणे व प्रकट करणे म्हणजे बंधुता होय. |
| १०) समता | कोणत्याही स्वरूपाच्या संकुचित भूमिकेतून माणसा-माणसात भेद न करता सर्वांना सारखे समजून आचरण करणे म्हणजे समता होय. |
| ११) खिलाडूवृत्ती | क्रीडा, विनोद, स्पर्धा, चर्चा इत्यादीमध्ये होणारा जय-पराजय, मतभेद, टीका यांचा हसतमुखाने निर्मळ मनाने स्वीकार करणे आणि प्रतिपक्षाविषयी गुणग्राहकता दाखविणे म्हणजे खिलाडूवृत्ती होय. |
| १२) भूतदया | सृष्टीतील मानवेतर प्राणिमात्रालाही प्रतिष्ठा आहे या जाणीवेने त्याच्याशी ममतेने वागणे म्हणजे भूतदया होय. |
| १३) निसर्गप्रेम | निसर्गाचे स्वयंमूल्य व सौंदर्य यांच्या जाणीवेतून, निसर्गाविषयी निरपेक्ष स्वरूपाची आत्मियता बाळगणे व प्रकट करणे म्हणजे निसर्ग प्रेम होय. |

१९७८ मध्ये एन.सी.ई.आर.टी. तर्फे ` नैतिक शिक्षण ` या विषयावर एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्रात वेळोवेळी भारतात जे विविध शैक्षणिक आयोग स्थापन करण्यात आलेले होते त्यांनी केलेल्या शिफारशींच्या व महात्मा गांधींच्या साहित्याच्या आधारावर ८४ मूल्यांची यादी जानेवारी १९७९ मध्ये "Documents on Social, Moral and Spiritual values in Education" या पुस्तकात प्रकाशित केलेली आहे. ती पुढीलप्रमाणे - [१]

1) Abstinence - (निर्व्यसनीपणा)

2) Appreciation of cultural values of others - (दुसऱ्यांच्या सांस्कृतिक मूल्यांचे महत्त्व जाणून घेणे)

3) Anti-untouchability (अस्पृश्यता निवारण)

4) Citizenship (नागरिकत्व)

5) Consideration for others (परमतसहिष्णुता)

6) Concern for others (सामाजिक बांधिलकी)

7) Co-operation (सहकार्य)

8) Cleanliness (स्वच्छता)

9) Compassion (करुणा)

10) Common cause (समाजहित)

11) Common good (समाजकल्याण)

12) Courage (धैर्य)

13) Courtesy (सौजन्य)

14) Curiosity (सत्य जाणण्याची उत्सुकता - जिज्ञासा)

15) Democratic Decision-making (लोकशाही जीवनपद्धतीमध्ये निर्णय घेण्याच्या पद्धतीशी समरसता)

16) Devotion (भक्ती - ईश्वरनिष्ठा)

17) Dignity of the individual (व्यक्तीच्या प्रतिष्ठे-
विषयी जाणीव)

18) Dignity of manual work (श्रमप्रतिष्ठा)

19) Duty (कर्तव्यपालन)

20) Discipline (शिस्त)

21) Endurance (सोशिकपणा)

22) Equality (समानत्व)

23) Friendship (मैत्री)

24) Faithfulness (एकनिष्ठपणा)

25) Fellow-feeling (कळवळा)

26) Freedom (स्वातंत्र्य)

27) Forward look (दूरदृष्टी)

28) Good manners (शिष्टाचार)

29) Gentlemanliness (सभ्यता)

30) Gratitude (कृतज्ञता)

31) Honesty (प्रामाणिकपणा)

32) Helpfulness (दुसऱ्यास सहाय्य करणे)

33) Humanism (मानवहित दृष्टी)

34) Hygienic living (आरोग्यमय जीवन व्यतीत करणे)

35) Initative (पुढाकार घेण्याची वृत्ती)

36) Justice (न्यायीपणा)

37) Integrity (एकात्मता)

38) Kindness (दया)

39) Kindness to animals (भूतदया)

40) Loyality to duty (कर्तव्यनिष्ठा)

41) Leadership (नेतृत्व)

42) National Unity (राष्ट्रीय ऐक्य)

43) National Consciousness (राष्ट्रीय जाणीव)

44) Non-violence (सत्याग्रह)

45) National integration (राष्ट्रीय एकात्मता)

46) Obedience (आज्ञाधारकपणा)

47) Peace (शांतताप्रेमी)

48) Proper utilisation of time (वेळेचा सदुपयोग)

49) Punctuality (वक्तशीरपणा)

50) Patriotism (स्वदेश प्रेम)

51) Purity (शुचिता)

52) Quest for knowledge (ज्ञानाचा शोध)

53) Resourcefulness (युक्तिबाजपणा)

54) Regularity (नियमितपणा)

55) Respect for others (दुसऱ्याबाबत आदर)

56) Reverence for old age (वृध्दांविषयी आदरभाव)

57) Sencerity (ककक)

58) Simple living (साधी रहाणी)

59) Social Justice (सामाजिक न्याय)

60) Self discipline (स्वयंशिस्त)

61) Self help (स्वावलंबन)

62) Self-respect (स्वाभिमान)

63) Self-confidence (आत्मविश्वास)

64) Self-support (स्वनिर्भरता)

65) Self-study (आत्मशोधन)

66) Self-secrifice (स्वार्थत्याग)

67) Self-control (आत्म-नियंत्रण)

68) Self-restraint (आत्मसंयमन)

69) Social Service (समाजसेवा)

70) Solidarity of Mankind (विश्वमानवता)

71) Sense of social responsibility (सामाजिक जबाबदारीची जाणीव)

72) Sense of discrimination between good and bad (सद्-असद् बुध्दी)

73) Socialism (समाजवादी दृष्टिकोन)

74) Sympathy (सहानुभूति)

75) Secularism and respect for all (ऐहिकदृष्टी व समभाव)

76) Service to others (सेवाभाव)

77) Spirit of enquiry (चौकसपणा)

78) Team Work (सांघिक काम)

79) Team spirit ( संघ प्रवृत्ती )

80) Truthfulness ( खरे बोलणे )

81) Tolerance (सहिष्णुता)

82) Universal truth (चिरंतन सत्य)

83) Universal love (सर्वांभूती प्रेम)

84) Value for national and civil property (सामाजिक व राष्ट्रीय संपत्तीच्या महत्त्वाची जाणीव)

मूल्यांचे केलेले हे विश्लेषण बरेच विस्तृत आहे. यातील प्रत्येक सद्गुण हा व्यक्तीची प्रतिमा उज्वल बनविण्यास उपयोगी ठरणारा आहे. हे सर्व सद्गुण जर व्यक्तीमध्ये निर्माण करता आले तर ती व्यक्ती मूल्यशिक्षणाचे दृष्टीने आदर्श ठरेल यात संशय नाही.

दैनंदिन व्यवहारात मूल्यांच्या पालनाबाबत बेफिकीर राहाणे म्हणजे मानवाच्या प्रगतीचे चक्र उलट गतीने नेण्याचा प्रयत्न होय. मानवी जीवनाची प्रगती व्हावी म्हणून मूल्यांनुसार आचरण करणे प्रत्येक समाज घटकाचे कर्तव्य आहे.

## २.३ मूल्य आणि शिक्षण :

व्यक्ती समाजात जगत असते. जगताना आणि जगण्यासाठी तिला वेगवेगळ्या सामाजिक भूमिका पार पाडाव्या लागतात. ह्या भूमिका चांगल्या-प्रकारे पार पाडण्यासाठी काही गोष्टींचे ज्ञान असावे लागते, काही कौशल्ये तिच्या अंगी असावी लागतात पण ह्याच बरोबर काही सद्गुणही तिच्या ठिकाणी बाणलेले असावे लागतात. हे सद्गुण अंगी असल्यामुळे व्यक्ती आपल्या आचरणात त्या दंडकांचे नियमाने पालन करीत असते म्हणजे त्या दंडकांच्या पालनात त्या सद्गुणांचा आविष्कार होत असतो. उदा.कोणत्याही डॉक्टरची, डॉक्टर म्हणून, समाजात एक विशिष्ट भूमिका असते. ती चांगल्या प्रकारे पार पाडण्यासाठी वैद्यकीय विषयांचे चांगले ज्ञान डॉक्टरला असणे आवश्यक आहे आणि रोगी बरा करण्यासाठी जे काही करणे आवश्यक असते ते करण्याचे कौशल्यही त्याच्या अंगी असावे लागते. पण तेवढ्यानेच भागत नाही. डॉक्टरला काही व्यावसायिक दंडक पाळावे लागतात. डॉक्टरने आपल्या ज्ञानाचा व कौशल्याचा उपयोग रोग्याला शक्य तितक्या लवकर बरे करण्यासाठी केला पाहिजे, त्याने आपल्या कामाचा योग्य तो मेहनताना जरूर घ्यावा पण रोग्याला त्याने नाडता कामा नये, रोग्याने स्वत:च्या प्रकृतीच्या संदर्भात त्याला सांगितलेल्या खाजगी गोष्टी त्याने इतरांना सांगता कामा नये, रोग्याविषयी त्याला जिव्हाळा वाटला पाहिजे, इत्यादी. चांगला डॉक्टर असणे म्हणजे केवळ कुशल डॉक्टर असणे नव्हे. चांगला डॉक्टर असणे म्हणजे एका विशिष्टवृत्तीने डॉक्टरकीचा

व्यवसाय करणे. अर्थात् तो एक चांगला डॉक्टर आहे, पण माणूस म्हणून वाईट आहे ` असे आपण अनेकदा म्हणतो. ह्याचा अर्थ तो एक कुशल डॉक्टर आहे, परंतु तो व्यावसायिक दंडक पाळीत नाही. रोग्यांविषयी त्याला जिव्हाळा वाटत नाही. आपल्या ज्ञानाचा उपयोग तो स्वार्थासाठी करतो असा होईल. आता समाजातील बहुसंख्य डॉक्टर जर कुशल डॉक्टर असतील, पण माणसे म्हणून वाईट असतील तर त्या समाजाला चांगली आरोग्यसेवा उपलब्ध होऊ शकणार नाही आणि ती मोठी सामाजिक हानी ठरेल हे उघड आहे.

चांगले सामाजिक जीवन फुलावे म्हणून, सामाजिक कल्याण वेगवेगळ्या अंगांनी साधले जावे म्हणून व्यक्तींना हरत-हेच्या भूमिका चांगल्या प्रकारे पार पाडाव्या लागतात. ह्यासाठी व्यक्तींच्या अंगी त्या त्या भूमिकेशी संबंधित असलेले विशिष्ट ज्ञान आणि विशिष्ट कौशल्ये ज्याप्रमाणे असावी लागतील त्याप्रमाणे काही सद्गुणही त्यांच्या अंगी असावे लागतात. इतर व्यक्तींकडे पाहाण्याच्या एका विशिष्ट वृत्तीतून, इतरांशी वागण्याच्या एका विशिष्ट पध्दतीतून, त्यांच्या विषयी विशिष्ट प्रकारची उद्दिष्टे बाळगून ती साध्य करण्याच्या प्रयत्नातून, त्यांच्या संबंधातील आचरणात काही दंडक पाळण्यातून ह्या सद्गुणांचा आविष्कार होतो. शिक्षण व्यवस्था जर हे सद्गुण विद्यार्थ्यांमध्ये बाणविण्यात यशस्वी होत नसेल तर, शिक्षण व्यवस्था म्हणून आपले एक योग्य आणि अनिवार्य असे कार्य ती पार पाडीत नाही असे म्हणावे लागेल.

हे सद्गुण अंगी बाणविणे म्हणजेच विद्यार्थ्यांमध्ये काही मूल्ये रुजविणे होय. ती अशाप्रकारे रुजविणे की त्यांची जीवनातील साध्ये आणि उद्दिष्टे व ती साधण्याची पध्दती ह्या मूल्यांमुळे निश्चित होईल ही मूल्ये त्यांच्या आचरणात उतरून त्याला आशय, आकार आणि दिशा देतील.

मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास हे शिक्षणाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट मानले जाते. त्यात शारीरिक, मानसिक, भावनिक, आत्मिक ( Psyche ) आणि पारमात्मिक ( Spiritual ) अशी पाच अंगे मानली आहेत. शारीरिक विकास हे मानवी व्यक्तिमत्व विकासाचे दृश्य अंग होय. शारीरिक विकास हा व्यक्तिमत्व विकासाचा मूलभूत आधार आहे. ` शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ` अशा उक्तीमधून ते स्पष्ट होते.

मानसिकता किंवा बुध्दिमत्ता हे मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वविकासाचे दुसरे महत्वाचे अंग. बुध्दी विकासामुळेच ` मनुष्य ` हा पृथ्वीतलावरील सर्वश्रेष्ठ प्राणी ठरला.

अंत:करणाचा विकास हे विकासाचे तिसरे अंग आहे. हृदयाची विशालता, अंत:करणाची उदारता हे व्यक्तिमत्व विकसित झाल्याचे महत्वाचे लक्षण मानले जाते.

व्यक्तिमत्त्व विकासात यानंतर मनुष्यमात्रातील आत्म्याचा किंवा चैतन्य तत्वाचा विकास अभिप्रेत आहे.

व्यक्तिमत्व विकासात पारमात्मिक ( Spiritual ) अंग सर्वोच्च मानले जाते. ज्यायोगे मनुष्यमात्र स्वत:ला विश्वातील माणसांशीच नव्हे तर पशुपक्षी यांसारख्या सर्व प्राणीमात्रांशी समारस होऊन एकरूप होतो ते अंग शिक्षणाने व्यक्तिमत्व विकास साधायचा म्हणजेच या पाचही अंगांचा सर्वोच्च विकास साधायचा.

सुप्रसिध्द शिक्षणतज्ज्ञ जे.पी. नाईक यांच्या मते शिक्षण प्रक्रियेची तीन प्रमुख उद्दिष्टे आहेत :

> "Education is essentially a three-fold process, imparting information, teaching of skills and cultivation of values. In the present educational system, the emphasis is

almost exclusively on the first of these objectives, viz. the imparting of information. The second objective, viz. the teaching of skills in partially attempted and the production skills are almost totally neglected... But the most important reform relates to the third objective which has been neglected in the past, viz. the cultivation of values. Let us realise that no education can be really value-neutral and that if we do not cultivate the right values, the wrong ones will eventually emerge and dominate the scence. We must, therefore, now lay the highest emphasis in our educational system on the cultivation of the values appropriate to the modern democratic and socialist society."[10]

शिक्षणाने विद्यार्थ्याला मूल्यांच्या बाबतीत केवळ बौध्दिक दृष्ट्या सचेत करून भागणार नाही तर त्याच बरोबर त्याच्या वृत्तीत इष्ट ते परिवर्तन घडवून आणले पाहिजे. मूल्ये मनुष्याच्या भावपिंड घडविण्याशी संबंधित आहेत, सर्व मूल्यांचा एकत्रित प्रभाव म्हणजे मनुष्याचा भावपिंड. विविध मूल्ये विद्यार्थ्यांत रुजविणे म्हणजे त्याचे भावजीवन घडविणे होय. व्यक्तीचे एका विशिष्ट प्रकारचे भावजीवन घडले म्हणजे ते त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व वा चारित्र्य बनते.

> "We are building a civilization, not a factory or a workshop. The quality of civilization depends not upon the material equipment or political machinery, but on the character of men. The major task of education is the improvement of character."[11]

असे डॉ. राधाकृष्णन म्हणतात.

(शिक्षणातून आपण एक संस्कृती घडवीत आहो, एखादा कारखाना नव्हे. संस्कृतीचे मूल्य व श्रेष्ठत्व हे भौतिक समृध्दी वा शासकीय यंत्रणेवर अवलंबून नसून माणसांच्या चारित्र्यावर आहे.)

शिक्षणाचे प्रमुख कार्य म्हणजे चारित्र्य निर्मिती. समाजाची व राष्ट्राची उन्नती ही चारित्र्य संपन्न लोकांवरच अवलंबून आहे. चारित्र्य किंवा सद्वर्तन हेच माणसांचे खरे धन. ` शीलं परं भूषणम् ` प्रामाणिकपणा, सत्यप्रियता, विनय, दु:खीकष्टी व गोरगरीब लोकांबद्दल सहानुभूती सेवा, त्याग, नि:स्वार्थी वृत्ती, माणुसकी, श्रध्दा, ध्येयनिष्ठा इत्यादी अनेकविध गुणांचा चारित्र्यात समावेश होतो. आध्यात्मिक वृत्ती हा नीतिमत्तेचा पाया आहे. आध्यात्मामुळे माणसात सर्वांभूती समभाव निर्माण होतो, दुसऱ्याचे दु:ख ते आपले दु:ख व दुसऱ्याचे सुख ते आपले सुख अशी मानवतेची भावना निर्माण होते. आध्यात्मिक व नैतिक सामर्थ्याच्या जोरावर मनुष्य स्वत:च्या विकारवासनांवर नियंत्रण ठेवू शकतो, त्याची विवेकबुध्दी जागृत होते, सारासार विचार करण्याची पात्रता निर्माण होऊन ज्ञानाचा किंवा बुध्दीचा लोकहितासाठीच उपयोग करण्याची इच्छाशक्ती विकसित होते. म्हणून विद्यार्थ्यांत सत् प्रवृत्ती, सद्‌विचार, सद्‌भावनांचे प्रवर्तन करणे, विविध मूल्यांचे त्यांच्यावर संस्कार करणे व त्यांचे चारित्र्य घडविणे हे शिक्षणाचे

सर्वश्रेष्ठ ध्येय ठरते. चारित्र्यनिर्मितीसाठी सतत सद्‌विचारांचे संस्कार मनावर होत गेले पाहिजेत, तद्‌नुसार कृती घडली पाहिजे व त्यातून योग्य अशा सवयी निर्माण झाल्या पाहिजेत. " चारित्र्य म्हणजे सवयींची पुनरावृत्ती व या पुनरावृत्तीमधून चारित्र्य निर्माण होते. "[१२] हे सद्‌विचारांचे संस्कार म्हणजेच विविध मूल्यांचे संस्कार घडविणे हे शिक्षणाचे सर्वश्रेष्ठ ध्येय आहे.

" शिक्षण म्हणजे उद्दिष्टानुरूप इष्ट दिशेने वर्तन परिवर्तन घडवून आणणारी प्रक्रिया " होय. शिक्षणामुळे व्यक्तीला ज्ञानप्राप्ती व्हावी, जीवन व्यवहारातील निरनिराळ्या क्रिया करण्यामध्ये कौशल्य प्राप्त व्हावे व शिक्षणातून त्या व्यक्तीची घडण व्हावी याचाच अर्थ असा की, शिक्षणाच्या प्रक्रियेत विद्यार्थ्यांच्या ज्ञानात्मक, भावात्मक, क्रियात्मक अशा तिन्ही स्तरांतून इष्ट बदल घडून यावयास हवा. प्रत्यक्षात मात्र असे दिसून येते की, अध्यापन पध्दतीचा अवलंब करीत असताना ज्ञानात्मक क्षेत्रावर जास्त प्रमाणात भर दिला जातो. अध्ययन प्रक्रियेत ज्ञानात्मक, भावात्मक व क्रियात्मक या तिन्ही घटकांचा विचार करून, त्यानुसार अध्ययन-अध्यापन पध्दतीचा अवलंब केल्यास या तिन्ही क्षेत्रात समतोल विकास घडून येईल व शिक्षण संपादन करून बाहेर पडणाऱ्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व संतुलित व समाजोन्मुख स्वभावाचे होईल.

शिक्षण संपादन करून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये संपादित ज्ञानाबरोबरच योग्य मूल्यांचा संस्कार होणे हे महत्त्वाचे ठरते. त्या दृष्टीने शाळा, महाविद्यालये या संस्था केवळ विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालणाऱ्या संस्था न ठरता, ती मूल्यांचा संस्कार करणारी केंद्रे ठरावीत यासाठीच शिक्षणाचे स्वरूप हे मूल्याधिष्ठित असावे. हे करण्यासाठी शिक्षकाने कोणती भूमिका घेतली पाहिजे हे पाहू.

## २.४ मूल्यशिक्षणात शिक्षकाची भूमिका :

विद्यार्थी शाळेत दाखल झाल्यापासून तो शालेय शिक्षण संपादन करून बाहेर पडेपर्यंतच्या काळात ज्या शालेय वातावरणात असतो त्या ठिकाणी चालू असणा-या दैनंदिन अध्ययन-अध्यापनातून, वातावरणातून, उपक्रमांतून विद्यार्थ्यांवर, चांगल्या मूल्यांचा संस्कार कसा होईल, या हेतूने दैनंदिन अध्ययन-अध्यापन, वातावरण व उपक्रम ही मूल्यांचा संस्कार करणारी माध्यमे कशी बनतील, हा विचार करणे आवश्यक ठरते. यासाठी अध्ययन-अध्यापन व शालेय उपक्रम यांचे जाणीवपूर्वक नियोजन होणे आवश्यक आहे.

मूल्यांचा संस्कार करणारे माध्यम म्हणून अध्ययन-अध्यापन पध्दतीचा स्वीकार केल्यानंतर सहाजिकच दैनंदिन अध्ययन-अध्यापनात मूल्यांच्या संस्कारांची सतत जाणीव हवी. अशा जाणीवपूर्वक अध्यापनासाठी काही पूर्वतयारी करावयास हवी.

अभ्यासक्रमातील विविध विषय व त्यावरील पाठ्यपुस्तके व आयोजित केलेले उपक्रम यांमध्ये कोणती जीवनविषयक मूल्ये अनुस्यूत आहेत, याचा प्रत्येक विषयशिक्षकाने शोध घ्यावयास हवा. यासाठी शिक्षकाने आपल्या विषयाचे अध्यापन केवळ माहिती, संज्ञा, संकल्पना, सूत्रे, सिध्दांत, नियम, व्याख्या, कारणे, परिणाम एवढ्याच ज्ञानात्मक स्तरांपुरते मर्यादित ठेवून चालणार नाही. आपल्या विषयाच्या अध्यापनातून आपणास कोणती मूल्ये विद्यार्थ्यांच्या अध्यापनातून आपणास जाणीवेत आणता येतील, हा विचार प्रत्येक विषय शिक्षकाने करावयास हवा. यासाठी आपापल्या विषयांची उद्दिष्टे, पाठ्यपुस्तके व उपक्रम यांतील कोणत्या घटकांचा उपयोग मूल्यांच्या संस्कारासाठी करता येईल, हे शोधून काढावे लागेल. या पूर्वतयारीसाठी मूल्यशोधपत्रक तयार करणे उपयुक्त ठरेल.

एखादे विशिष्ट मूल्य एका विशिष्ट विषयाच्या घटकातून संस्कारित होईल असे नाही, तर तेच मूल्य अभ्यासक्रमातील इतर विषय किंवा शाळेतील आयोजित केल्या जाणाऱ्या नित्य व नैमित्तिक स्वरूपाच्या इतर उपक्रमांतूनदेखील संस्कारित होऊ शकेल. तसेच एका घटकाच्या अध्यापनातून, एकापेक्षा अधिक मूल्यांचा संस्कार करणेही शक्य होईल. याकरिता विषयपाठ, उपक्रम यांचे नियोजन डोळसपणे व्हावयास हवे. उदा. वर्गाची सहल आयोजित करून त्यामधून निसर्गप्रेम, सहकार्य, श्रमनिष्ठा, खिलाडूवृत्ती इत्यादी मूल्यांचा संस्कार साधता येईल.

अध्ययन-अध्यापन पद्धतीत अध्यापनापेक्षा अध्ययनास महत्त्व असते हे सर्वमान्य आहे. अध्ययन होण्यासाठी विद्यार्थ्यांना अनुभव मिळणे आवश्यक असते. अनुभव हा प्रत्यक्ष स्वरूपाचा असू शकेल किंवा अप्रत्यक्ष स्वरूपाचा असू शकेल. दैनंदिन अध्यापनातून विद्यार्थ्यांनी जी मूल्ये आत्मसात करावीत असे आपणास अभिप्रेत आहे त्या मूल्यांशी सुसंगत असे अनुभव विविध प्रसंगांद्वारे विद्यार्थ्यांना द्यावयास हवेत.

अध्ययन-अध्यापनाच्या जोडीला अभ्यासपूरक व अभ्यासानुवर्ती उपक्रमांची आवश्यकता समजण्यासाठी प्रत्यक्ष अध्ययन-अध्यापन क्रिया चालू असता विद्यार्थी कोणत्या अनुभवातून जात असतात ते पहाणे इष्ट ठरते. एखाद्या विषयाचे अध्ययन-अध्यापन चालू असताना, विद्यार्थ्यांसमोर श्रवणातून, वाचनातून काही मूल्ये आलेली असतात. कोणताही विषय असो, मग ती भाषा असो, विज्ञान असो किंवा इतिहास, भूगोल असो. त्या त्या विषयाचे अध्ययन करीत असताना, विद्यार्थी काही अप्रत्यक्ष अनुभव घेत असतो.

एखाद्या गद्य व पद्य पाठाचे वाचन करीत असताना, लेखकाने स्वतः अनुभवलेला प्रसंग किंवा त्याने पाहिलेल्या घटनेचे वर्णन समर्पक शब्दांची योजना करून केलेले असते. हे सर्व वाचत असताना, लेखकाच्या अनुभवाशी विद्यार्थी तादात्म्य पावतो व नकळत त्यात अनुस्यूत असलेल्या मूल्यांचा स्वीकार करण्याची

त्याची तयारी होते. अर्थात ही एक मानसिक प्रक्रिया आहे. शिक्षकाने ज्या ज्या ठिकाणी अशी मूल्य-स्थळे असतील, ती शोधून त्या भागाचे अध्यापन चालू असताना ती विद्यार्थ्यांना माहीत व्हावीत व त्यांचे जीवनातील महत्त्व त्यांना समजावे या हेतूने आपले अध्यापन आकर्षक शैलीत, उदाहरणे, दाखले, दृष्टांत यांनी समृध्द करावयास हवे.

काही उपक्रमांतून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष स्वरूपाचे अनुभव प्राप्त होतात. उदाहरणार्थ १) निरीक्षणात्मक उपक्रम, २) कथा-कथन, ३) रचनाकृती निर्मिती, ४) नाट्यीकरण, ५) भूमिका अभिनय, ६) प्रयोग करणे, ७) वादविवाद, ८) आकाश दर्शन, ९) निसर्ग निरीक्षण, १०) कविता श्रवण, ११) कविता गायन, १२) सामूहिक कविता गायन, १३) विविध प्रकारचे संग्रह तयार करणे, १४) समाजसेवात्मक उपक्रम, १५) कार्यानुभव, १६) शालेय स्वराज्य, १७) क्रीडांगणावरील खेळ, १८) शालेय उत्सव, समारंभ, १९) राष्ट्रीय सण, २०) शालेय सहकारी भांडार चालविणे.

अप्रत्यक्ष अनुभव - १) वाचन, २) श्रवण, ३) तक्ते, ४) प्रतिकृती, ५) रेडिओ, ६) दूरदर्शन, ७) चित्रपट्या, ८) बोलपट, ९) बोलक्या भिंती, १०) विविध प्रदर्शने इत्यादी.

अध्ययन-अध्यापनाचे नियोजन करीत असताना पाठयविषयात अंतर्भूत असलेल्या मूल्यांचा संस्कार प्रभावीपणे होण्यासाठी विद्यार्थ्यांना वरीलपैकी कोणत्या स्वरूपाचा अनुभव देणे आवश्यक व शक्य आहे याचा विचार नियोजनात करावयास हवा. वरील अनुभवांसाठी कोणती स्थळे आणि प्रसंग यांची योजना करता येणे शक्य आहे याचाही विचार होणे आवश्यक आहे. घर, शालेय परिसर व सामाजिक परिसर या तिन्ही ठिकाणी हे अनुभव मिळत असतात. म्हणून ही स्थळे व प्रसंग यांची निवड काळजीपूर्वक करावयास हवी.

9592

A

दैनंदिन अध्यापनाच्यावेळी प्रत्येक शिक्षक जो घटक शिकवावयाचा त्याचे टिपण काढीत असतात, या टिपणामुळे आपले अध्यापन निर्धारित उद्दिष्टांच्या दिशेने होण्यास मदत होते. दैनंदिन अध्यापनापूर्वी आपण आपल्या अध्यापन विषयाचे घटक नियोजन ही करीत असतो. ते करीत असताना त्या विषय घटकांच्या उद्दिष्टांचा ज्याप्रमाणे आपण आज विचार करीत आहोत, त्याच जोडीला त्या घटकांचे अध्यापन करीत असताना त्या पाठ्यांशात कोणते मूल्य अनुस्यूत आहे, याचाही विचार आता आपणांस करावयाचा आहे. यासाठी वेगळे स्वतंत्र नियोजन किंवा स्वतंत्र टिपण काढण्याची आवश्यकता नाही, करावयाचे ते स्वढेच की, जो पाठ्यांश शिकवावयाचा, तो शिकवित असताना त्यातील ज्या प्रसंगातून, घटनेतून एखादे मूल्य विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविणे आपणास शक्य आहे त्या प्रसंगाचे अध्यापन चालू असताना विद्यार्थ्यांना त्या मूल्याची जाणीव करून द्यावयाची आहे.

अध्यापन करीत असताना अभिप्रेत असलेले पूर्वापार चालत असलेले विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान आजमावून पाहाणे, स्पष्ट नि:संदिग्ध स्वरूपात प्रतिपाद्य विषयाचे हेतुकथन करणे हे टप्पे रहातील. विषय प्रतिपादनविषयक टप्प्यात, शैक्षणिक संस्कार या सदराखाली आपण शिक्षकाची कृती व विद्यार्थ्यांची कृती हे भाग पाडून त्या त्या भागात आवश्यक तपशील लिहित असतो.

शालेय अभ्यासक्रमातील विविध विषयांचे अध्यापन, हे मूल्याधिष्ठित स्वरूपाचे असावयास हवे हा विचार पायाभूत मानून आपणास अध्यापन करावयाचे असल्याने, शिक्षक कृती व विद्यार्थी कृती या सदरात, अध्यापन विषयांतून ज्या मूल्यांचा संस्कार करावयाचा, त्या संदर्भात आपणास तपशील द्यावा लागेल.

अध्यापनविषयक घटकात अनुस्यूत असलेल्या मूल्यांची जाणीव, त्या विशिष्ट घटकाचे अध्यापन चालू असताना शिक्षकांनी करावयाची असल्याने, ही जाणीव शिक्षक कोणत्या पध्दतीने करणार, याचा तपशील शिक्षक कृती या सदरात पाठ्यांशा समोर लिहावा लागेल.

विद्यार्थी कृती या सदरात, आपण विद्यार्थ्यांकडून अध्यापनविषयक घटकातील भागाचे अध्ययन होण्यासाठी, त्यांना कोणते अनुभव पुरविणार - विद्यार्थी कोणती क्रिया करणार, हे लिहित असतो. आता याच जोडीला त्या घटकातून, ज्या मूल्यांचा संस्कार करावयाचा, त्याच्या दृढीकरणासाठी आपण जे अभ्यासानुवर्ती उपक्रम योजणार आहोत, त्यांचा नामनिर्देश यापुढे करावा लागणार. यावरून असे दिसून येईल की, हे करीत असताना, यासाठी शिक्षकाला वेगळे श्रम किंवा तक्ते करावे लागणार नाहीत.

मूल्यशिक्षण हे अनेक माध्यमाद्वारे देता येते. तसे ते अभ्यासक्रमाच्या विविध विषयांतून देता येते. अभ्यासक्रमातील काही विषयांना पाठ्यपुस्तके असतात. उदा. मातृभाषा, दुसरीभाषा, तिसरीभाषा, इतिहास, भूगोल, विज्ञान इ. मराठीच्या पाठ्यपुस्तकाच्या माध्यमातून मूल्यशिक्षण कसे देता येईल याबद्दल आता आपण अधिक विचार करू.

## २.५ मूल्य विकसनाच्या दृष्टीने मातृभाषेच्या पाठ्यपुस्तकांचे अध्यापन :

मूल्यविकसनाच्या दृष्टीने मातृभाषा मराठीचे अध्यापन या मुद्याचा विचार करण्यापूर्वी मातृभाषा मराठी असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जीवनातील या भाषेचे असलेले महत्व पाहू या.

मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा तसेच महाराष्ट्रातील बहुसंख्य लोकांची मातृभाषा आहे. मातृभाषेच्या सामर्थ्यावर कोणत्याही विषयाच्या अभ्यासासाठी आवश्यक असलेली आकलन शक्ती व कौशल्ये यांचा विकास

होण्यास मदत होते. विद्यार्थ्यांच्या भावनिक, बौध्दिक, सामाजिक, विकासात मातृभाषेच्या अभ्यासाला महत्व आहे.

विकसित विचारशक्ती हा विकासाचा महत्वाचा पैलू आहे. विचारशक्तीचा विकास करावयाचा असेल तर तो मातृभाषेद्वारेच शक्य आहे. ज्या भाषेवर माणसाचे प्रभुत्व असते अशा भाषेतच त्याला सहजतेने विचार करता येतो. या दृष्टीने विचारांची वाहक म्हणून मराठी भाषेचे स्थान विशेष आहे.

विद्यार्थ्यांत काही मूल्ये व निष्ठा संक्रमण करण्याचे कार्य शिक्षणाला करावे लागते. या निष्ठा निर्माण करण्याचे कारण म्हणजे विद्यार्थ्यांना मानवी संस्कृतीचा वारसा प्राप्त करून देणे हे होय. मानवी समाजाचे म्हणून काही आचार, विचार, कल्पना, तत्वज्ञान, कला, वाङ्मय, जीवनमूल्ये या गोष्टी आहेत. या सर्व गोष्टींचा समावेश आपण संस्कृतीत करतो. संस्कृतीचा हा वारसा पुढच्या पिढीला भाषेच्या माध्यमातूनच मिळतो. महाराष्ट्रीय समाजाचा सांस्कृतिक वारसा मराठी भाषेतूनच मिळणार आहे. नव्या पिढीला हा सांस्कृतिक वारसा मिळाला नाही तर ती मराठी संस्कृतीला पारखी होतील. आपल्या पूर्वजांचे, आपल्या संस्कृतीचे सम्यक् दर्शन मातृभाषेच्या अध्ययनातून घडते.

मानवाच्या आत्मप्रगटीकरणाच्या धडपडीतून भाषा निर्माण झाली. भाषेच्या मदतीने मनुष्य आपले विचार, आपल्या भावना, इच्छा, आकांक्षा, सुखदु:खे, यथार्थपणे व्यक्त करू शकतो व दुसऱ्यांचेही सुखदु:ख समजून घेऊ शकतो.

माणसाला जशा जन्मजात सहजप्रवृत्ती असतात तशाच त्याला भावनाही असतात. मुलाच्या भावना-विकास मातृभाषेच्या अभ्यासातून होत असतो. भावनांच्या विकासावरच मुलाचे चारित्र्यघडण व शीलसंवर्धन अवलंबून

असते. मातृभाषेच्या वाङ्.मयाच्या अभ्यासातून मुलाचा भावनिक विकास होत असतो. विविध प्रकारांच्या भावनांचे परिपोषण होणे हे संपूर्ण मानसिक स्वास्थाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सद्भावनांचा विकास झाल्याशिवाय मानवाचे व्यक्तित्व आकारले जात नाही. भावनांचा विकास व सत्प्रवृत्तींचे पोषण इष्ट संस्काराशिवाय होत नाही आणि हे संस्कार करण्याचे सामर्थ्य भाषेत आहे. भाषेमध्ये विचारांना हेलावून सोडण्याचे सामर्थ्य आहे. व्यक्तीच्या मनावर सामाजिक, कलात्मक, अध्यात्मिक मानवी मूल्यांचे संस्कार करणे ह्या गोष्टी फक्त भाषाच करू शकते.

"कोणत्याही कलेचा नमुना पाहिला की, कोणतीतरी भावना जागृत होते. मग ती कला वाङ्.मयातील कथा असो, कादंबरी असो, काव्य असो, नाटय असो की नृत्य. सत्याचा जय, असत्याचा पराजय, सज्जनांचे रक्षण, दुर्जनांचा बिमोड, सद्गुणांची वाखाणणी तर दुर्गुणांची निर्भत्सना, बालकांविषयी मायाममता, दुर्दैवी जीवासाठी जिव्हाळा वाटणे इत्यादींचा विकास कलांच्या अभ्यासातून, परिचयातून होतो." प्रत्येक भाषेने एक वैशिष्टयपूर्ण संस्कृती निर्माण केली आहे, तिने आपल्यासमोर काही जीवन-मूल्ये व जीवनादर्श निर्माण केले आहेत. त्यांचे संस्कार मातृभाषेच्या माध्यमातून बालपणापासून सतत होत असतात. अशाप्रकारे संस्काराच्या दृष्टीने भाषा मुलाला जीवनरस पुरविते. या जीवनरसानेच त्यांचे व्यक्तिमत्त्व उमलते, फुलते, बहरते. श्री. ग. वि. अकोलकर म्हणतात - " व्यक्तित्वाच्या वेलीवर उमलणाऱ्या सुंदर सुमनांना मातृभाषा हाच जीवनरस आहे." [१३]

अशाप्रकारे विद्यार्थ्यांच्या मूल्यशिक्षणाच्या दृष्टीने मातृभाषेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. मातृभाषा अभ्यासक्रमाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत - विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास करणे, सामाजिक स्थैर्य व प्रादेशिक ऐक्य घडवून आणणे, अन्यभाषा, देश, धर्म, संस्कृती यांच्याकडे पाहण्याचा विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन,उदार व सहिष्णू बनविणे इत्यादी.

इयत्ता ११ वी, १२ वीच्या पाठयपुस्तकांच्या प्रस्तावनेतच मातृभाषा अध्यापनाची उद्दिष्टे विशद केली गेली आहेत. उच्च माध्यमिक ११ वी आणि १२ वी या इयत्तांच्या इंग्रजी, मराठी आणि हिंदी इत्यादी भारतीय भाषांचे अध्ययन एकाच स्तरावर करावे असे नवे धोरण महाराष्ट्र शासनाने अंगिकारले आहे. या धोरणानुसार इयत्ता १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी ` युवक भारती ` हे पुस्तक तयार करण्यात आले. भाषेचे अध्ययन आनंदासाठी, जीवनदृष्टी विकसित करण्यासाठी व विचार समृध्द करण्यासाठी आवश्यक आहे. एकस्तरीय भाषाभ्यासाच्या धोरणानुसार या पुस्तकात सूक्ष्म अभ्यासासाठी गद्यपाठ व कविता यांची निवड केली आहे. ही निवड करताना इ. ११ वी पर्यन्त मराठी भाषा व साहित्य यांचे जे अध्ययन झाले आहे ते विचारात घेऊन पाठांची निवड करण्यात आली आहे. विविध वाङ्.मय प्रकारांचा आणि वाङ्.मयक्षेत्रातील एकक नव्या आणि जुन्या प्रवृत्तींचा परिचय व्हावा, निकोप सामाजिक दृष्टी विकसित व्हावी आणि वाङ्.मयीन जाण समृध्द करावी ही उद्दिष्टे पाठ निवडतांना स्वीकारली आहेत.

या दृष्टीने उच्च माध्यमिक स्तरावरील पाठयपुस्तकांचा विचार करता असे आढळले की, मातृभाषा मराठीच्या पाठयपुस्तकात असे वेचे व असे साहित्य आहे की, जे विद्यार्थ्यांमध्ये जीवनविषयक योग्य दृष्टिकोन विकसित करतील आणि त्यांच्यात सामाजिक, सांस्कृतिक व नैतिक मूल्यांचा विकास घडवून आणतील.

अशा उद्दिष्टांनी तयार केलेल्या अभ्यासक्रमाच्या कार्यवाहीतून व त्या अनुसार लिहिलेल्या पाठयपुस्तकांच्या अध्यापनातून सहजच मूल्यशिक्षण व्हायला पाहिजे. पण तसे होत नाही याचे कारण पाठयपुस्तक शिकविताना आपण या उद्दिष्टांकडे लक्षच देत नाही. भाषा शिकविताना आपण शब्दांचे अर्थ सांगतो, म्हणी-वाक्प्रचार समजावून सांगतो, वाक्यांचे संदर्भ सांगतो ते कसे लिहायचे ते सांगतो; पण ते सारे कशासाठी करतो ? त्याकडे आपले दुर्लक्ष होते.

पाठयपुस्तकातून मूल्यशिक्षण द्यायचे म्हणजे नेमके काय करायचे ते सांगायचे झाल्यास त्या त्या विषयांच्या पाठयक्रमाच्या सुरुवातीस जी जी उद्दिष्टे सांगितली आहेत, त्यापैकी मूल्यांवर भर देऊन त्यांचे संस्कार विद्यार्थ्यांवर होतील अशाप्रकारे अध्यापन करणे असे सांगता येईल.

मग प्रश्न असा उत्पन्न होतो की, विषयांच्या अध्यापनात पाठय-पुस्तकातील मूल्यांवर भर देऊन अध्यापन करायचे म्हणजे नक्की काय करायचे ? व कसे करायचे ?

आपणास मातृभाषेच्या अध्यापनातून मूल्यसंस्कार या बाबीचा विचार करावयाचा असल्याने मातृभाषेच्या पाठयपुस्तकातून असे अध्यापन कसे करता येईल हे पाहू.

मातृभाषा या एकाच विषयाच्या सर्वच वर्गांच्या पाठयपुस्तकातील व त्यातील काही थोडया पाठातील मूल्यांची उदाहरणे पाहू.

मातृभाषा या एकाच विषयाच्या इयत्ता ११ वी, १२ वीच्या पाठयपुस्तकातील व त्यातील काही थोडया पाठातील मूल्यांची उदाहरणे पाहू.

इयत्ता ११ वीच्या पहिल्या पाठात ` पाखाल बालक पांगुरवणे ` या म्हाईंभटांच्या लीळेत एक कर्तव्यदक्ष माता, मुलावर जिवापाड प्रेम करणारी (वात्सल्य), गुणग्राहक माता तसेच ` भक्ती ` मनात असलेली माता आपणा समोर उभी केलेली आहे.

तिसरा पाठ - गोपाळ गणेश आगरकर यांचा ` इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार ` या निबंधात त्यांनी सामाजिक सुधारणांविषयी आपले विचार मांडले आहेत. यात मानवजाती विषयीचा

` आत्मसन्मान,`` सामाजिक ऐक्य,`` सामाजिक बदलाची जाणीव,` ` बुध्दिप्रामाण्यवादी दृष्टिकोन ` अशी कितीतरी मूल्ये आढळतात.

सहावा पाठ ` आम्ही युग बनविणारे आहोत ` या विनोबा भावे यांच्या लेखातून आशावाद, सर्वोदय, आत्मनिरीक्षण, आत्मसन्मान, दातृत्व अशी अनेक मूल्ये स्पष्ट होतात.

तर मराठीतील श्रेष्ठ कादंबरीकार वि.स. खांडेकर यांच्या ` मोत्यांचे पीक ` या रूपक कथेतून खऱ्याखुऱ्या जीवनाचा व जीवनमूल्यांचा साक्षात्कार वाचकाला होतो. या पाठातून संपत्तीच्या मोहाचे दु:ष्परिणाम प्रेम, मानवता, नि:स्वार्थता, पावित्र्य, अन्न हे पूर्ण ब्रह्म (मूक श्रेष्ठ) अशी अनेक मूल्ये दिग्दर्शित होतात.

अनंत काणेकर यांनी डायरी शैलीत लिहिलेल्या ` कोलंबो दर्शन ` (पाठ ९ वा) प्रवास वर्णनात ` जिज्ञासा,`` निरीक्षण,`` आत्मसंवेदन ` ही मूल्ये आहेत हे लक्षात येते.

अशाप्रकारे अनेक पाठात विद्यार्थ्यांवर जे संस्कार व्हावे असे आपण अपेक्षितो ते संस्कार करण्यास संधी आहेत. गद्याप्रमाणे पद्य पाठातही मूल्ये जोपासण्यासाठी संधी असतात. इयत्ता ११ वीची तिसरी कविता मुक्ताबाईचे ` ताटीचे अभंग ` यातून सहनशीलता, योग्यतेची जाणीव, धिटाई, लोकोध्दारकार्यात प्रोत्साहन, षड्रिपूंवर विजय ही मूल्ये आढळतात. तर कवि ` बी ` यांच्या ` चाफा ` या कवितेत उदात्त प्रेम, शुध्द प्रेम भावना ही मूल्ये आढळतात.

` उशिराचा पाऊस ` या कवितेतील –

असा उशिरा आलेला पाऊस तळहातावर
झेलून घ्यावा ।
टिपून त्यावा पापण्यांवरती कमाईच्या घामामध्ये
मिळवावा ॥

या ओळींतून निसर्ग प्रेम, स्वागतशील वृत्ती या मूल्यांचा साक्षात्कार होतो तर -

त्याला बोलू नये अधिक उणे
आणि काढू नये त्याचे बह्कणे ।

या ओळींतून ` क्षमाशीलवृत्ती ` हे मूल्य स्पष्ट होते.

पाठयपुस्तकातून मूल्यशिक्षण द्यायचे म्हणजे तो पाठ वाचताना त्या पाठात कोणकोणत्या मूल्यांचा म्हणजे कोणत्या सद्गुणांचा संस्कार विद्यार्थ्यांवर करण्याकरता संधी आहेत ते प्रथम शोधले पाहिजे. हा बोध घेण्याच्या दृष्टीने पाठ वाचला तर काही मूल्ये त्वरीत लक्षात येतात. उदा. कोलंबो दर्शन या प्रवास वर्णनातील जिज्ञासा, निरीक्षण, आत्मसंवेदन ही मूल्ये सहजी ध्यानात येतात पण तोच पाठ अधिक बारकाईने व काळजीपूर्वक वाचला तर .... कोलंबोतल्या प्राणीसंग्रहालयातील लावलेल्या एका पाटीवरील मजकूर असा आहे - ` इथे जंगलातल्या जनावरांना बंदुकीच्या गोळ्यांची भीती काडीमात्र मनात न आणता मनुष्यप्राण्यांचा चांगलाच अभ्यास करता येतो ` दुसरीकडे सुसरीच्या हाडांचा सापळा ठेवला आहे ` तुम्ही दगड मारून हिला ठार केले ` अशी पाटी तिथे आहे या दोन वाक्यांतून स्पष्ट होणारी मूल्ये - बंदुकिच्या गोळीने जंगली प्राणीमात्रांची केली जाणारी हत्या व त्यामुळे सृष्टीत निर्माण होणारे असंतुलन तसेच प्राणिसंग्रहातील पिंजऱ्यातील प्राण्यांनाही मुले दगड मारतात ही दुष्प्रवृत्ती यातून प्राणिमात्रांविषयी प्रेम - ` भूतदया ` हे मूल्य स्पष्ट होते हे लक्षात येते.

पाठयपुस्तकातून मूल्यशिक्षण देण्यासाठी प्रथम त्या त्या पाठातून कोणत्या मूल्यांचे संस्कार करता येणे शक्य आहे ती मूल्ये शोधली पाहिजेत. पाठयपुस्तकातून मूल्यशिक्षण देण्याची ही अगदी प्राथमिक तयारी आहे.

या नंतर तीच मूल्ये रुजविण्यासाठी त्या आधीदरच्या वर्गाच्या विषयांच्या पाठ्यपुस्तकात अशा कोणत्या संधी होत्या यांचा अभ्यास वा पुन:स्मरण केले पाहिजे असा अभ्यास केला तर तेच विशिष्ट मूल्यं रुजविण्यास आधीदरच्या वर्गाच्या पाठ्यपुस्तकात अशा कोणत्या संधी होत्या त्या समजतात.

पूर्वीच्या मराठीच्या अध्यापनाबाबत अशा संधींची उदाहरणे द्यायची झाली तर इयत्ता १२ वीचा 'क्रांतिप्रवण कल्पना' या पाठातील मूल्ये - वर्गविरहित समाजव्यवस्था, स्वातंत्र्य, समता, बंधुता, देशबांधवातील ऐक्यभावना, ही मूल्ये रुजविताना इ. ११ वीच्या पाठ्यपुस्तकामधील 'सामाजिक लोकशाहीचे प्रणेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या पाठातील वर्गविरहित समाजव्यवस्था, स्वातंत्र्य, समता, बंधुता, परस्पराविषयी सहानुभूती, ऐक्य भावना ह्या मूल्यांचे पुन:स्मरण करून देता येईल.

इयत्ता १२ वीचा 'संगणक आणि आपण' हा पाठ शिकविताना इयत्ता ११ वीचा 'अंतराळ शोध' या पाठातील पूर्वी अभ्यासलेली मानवाची संशोधन वृत्ती, जिज्ञासा, जिद्द, कुतूहल, विज्ञानविषयक अभिरूची या मूल्यांचे स्मरण करून देता येईल.

गद्याप्रमाणे पद्य पाठाचीही अशी अनेक उदाहरणे देता येतील.

इयत्ता १२ वीची शंकर रामाणी यांची 'पाऊस' ही कविता शिकविताना इयत्ता ११ वीची कवि अनिल यांची 'उशिराचा पाऊस' ह्या कवितेतील 'निसर्ग प्रेम' ह्या मूल्याची पुनरावृत्ती करता येईल.

इयत्ता ९ वीच्या 'श्रावण' या कवितेतील निसर्ग प्रेम, इयत्ता १० वीच्या 'फुलराणी' या कवितेतील निसर्ग प्रेम याची जाणीव, इयत्ता ११ वीच्या 'लपक झपक झाडीतून' या कवितेतील निसर्गप्रेम या मूल्यांची जाणीव करून देताना विद्यार्थ्यांच्या स्मरणात आणून देता येईल.

इयत्ता १२ वीची कविता ` या दु:खाच्या कढईची ` यातील ` सहनशीलता ` या मूल्याची जाणीव करून देताना इ. ११ वीची ` माझ्या डोळ्यांसमोरून ` या कवितेतील ` सहनशीलता ` या मूल्याची आठवण करून देता येईल.

इयत्ता ११ वी व १२ वीला ज्ञानेश्वरांचे काव्य आहे. तेव्हा इ. १२ वीला असलेली कविता ` शांताचेया घरा ` (विश्वरूप दर्शन योग ११ वा अध्याय) या कवितेतून व्यक्त होणारे संतवृत्ती, परमार्थज्ञान, भक्तीरस या मूल्यांचे संस्करण करताना इ. ११ वीची कविता अभय आणि सत्त्वसंशुद्धी (१६ व्या अध्यायातील दैविसंपत्तीचे वर्णन) यातून व्यक्त होणारे परमार्थज्ञान, संतवृत्ती, भक्तिरस या मूल्यांचे पुन:स्मरण करून देणे फायद्याचे होईल.

क्रमश: वरील वर्गांच्या पाठ्यपुस्तकाचे अध्यापनाचेवेळी मागील पाठातील अशा उदाहरणांचे स्मरण करून देणे, ते मूल्य रुजविण्याकरिता निश्चित उपयोगी पडेल.

पूर्वीच्या पाठातील संधीचा उपयोग करणे म्हणजे मूल्य रुजविण्याकरिता उभा समवाय साधणे, असे आपण म्हणू या.

उभा समवाय तसा आडवाही समवाय साधावा. याचा अर्थ त्याच वर्गाच्या पण अन्य विषयांच्या पाठ्यपुस्तकांत तेच मूल्य रुजविण्याकरिता संधी आहेत का याचा अभ्यास करावा व त्याही संधीचा उपयोग करावा.

यानंतरची पायरी म्हणजे त्या त्या मूल्यांच्या बीजारोपणास पोषक अशा कथा, कविता, म्हणी, उदाहरणे यांचा संग्रह करणे होय. अध्यापनाच्या ओघात अशा कथा सांगाव्यात, उदाहरणे द्यावीत पण त्या सांगताना वा उदाहरणे देताना विद्यार्थ्यांचे वय व अनुभव लक्षात

घ्यावा. त्यांच्या जीवनात त्यांना आलेले वा सहजी येणारे अनुभव त्यांनी पाहिलेले दृश्ये, ऐकलेली वा वाचलेली वर्णने यांचा उपयोग करावा. मूल्यांचे बीजारोपण होण्यास अशा उदाहरणांचा चांगला उपयोग होतो.

एखादे मूल्य रुजविण्याच्या प्रयत्नात आपली बोलण्याची, वर्णन करण्याची पध्दत प्रशंसात्मक, प्रेरणात्मक असावी ` असे वागणे फारच चांगले,` ` अशा वागण्याने सर्वांना फार आनंद झाला,` ` किती छान वागला तो विद्यार्थी ` अशा प्रशंसात्मक वाक्यांचा व प्रेरणात्मक विवेचनाचा विद्यार्थी मनावर चांगला प्रभाव पडतो. मूल्य रुजविण्याच्या प्रयत्नात ` तुम्ही असे वागा,`` असे वागले पाहिजे ` असा आज्ञार्थी प्रयोग शक्यतो करू नये.

पाठ्यपुस्तकातून ` मूल्यशिक्षण ` चा प्रस्ताव आला की मग तो विषय केव्हा शिकवायचा ? भाषा शिकविताना भाषिक कौशल्ये केव्हा शिकवायची ? वाङ्मयी वैशिष्ट्ये केव्हा समजावून द्यावयाची ? असे प्रश्न उत्पन्न होतील. असे प्रश्न निर्माण होण्याचे प्रमुख कारण म्हणजे ते विषय तसे शिकविणे म्हणजेच ` खरे शिकविणे ` होय अशी आपली समजूत झाली आहे. ते ते विषय कोणत्या उद्दिष्टांनी शिकवायचे त्या उद्दिष्टांकडे विशेषत: त्या उद्दिष्टात जी मूल्ये रुजवावीत असे सांगितले आहे त्या उद्दिष्टांकडे आपण पूर्ण दुर्लक्ष करीत आलो आहोत. त्यातील मूल्यांच्या संवर्धनाच्या दृष्टीने आपण पाठ शिकवीत आलो असतो तर पाठ्यपुस्तकांतून मूल्यशिक्षण कसे द्यायचे हा प्रश्नच उत्पन्न झाला नसता.

भाषिक कौशल्ये आदि अन्य उद्दिष्टांबरोबर मूल्यांचा संस्कार हेही शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी पाठ्यपुस्तकात अनेक संधी दिल्या आहेत, त्याकडे आपण दुर्लक्ष केले तर तो विषय नीटपणे आपण शिकविला नाही असे होईल. तेव्हा मूल्यसंस्काराचे दृष्टीने पाठ्यपुस्तक शिकविणे हे तो

विषय शिकविण्याचे अविभाज्य अंग आहे. त्या त्या विषयांच्या उद्दिष्टांप्रमाणे तो विषय शिकविणे हे आपले कर्तव्य आहे.

आज ही वाट पायाखालची झालेली नाही. पण मूल्यशिक्षण ही काळाची गरज आहे हे शिक्षकाने ओळखले पाहिजे. समजावून घेतले पाहिजे. तेव्हा वरील परिच्छेदांतून निर्देश केल्याप्रमाणे पाठ्यपुस्तकांतून मूल्यशिक्षण देण्याचा निर्धार करून शिक्षकाने काळाच्या या मागणीला भरघोस प्रतिसाद दिला पाहिजे.

२.६ समारोप :

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण मूल्य म्हणजे काय ?, मूल्य आणि शिक्षण यांचा परस्पर संबंध, मूल्यशिक्षणात शिक्षकाची भूमिका, मूल्यविकसनाचे दृष्टीने मातृभाषेच्या पाठ्यपुस्तकाचे अध्यापन या मुद्यांचा परामर्श घेतला. समस्येशी संबंधित संशोधित साहित्याचा आढावा घेण्यासाठी आता आपण पुढील प्रकरणाकडे वळू या.

## संदर्भ

1) International Dictionary of Education, G. Terry Page and J.B. Thomas with A.R. Marshall (London : The English Language Book Society and Kogan), p. 1979.

२) मे.पु. रेगे, मूल्यांचे शिक्षण, शिक्षण आणि समाज (त्रैमासिक) (पुणे : इंडियन, इन्स्टिटयुट ऑफ एज्युकेशन, जुलै-सप्टेंबर, १९८१), पृ. १९०.

3) Report of the Working Group to Review Teacher's Training Programme in the Light of the Need for Value Orientation, (New Delhi : Published by the Ministry of Education and Culture, Government of India, 1983).

४) रा.मा. देवस्थळी, विद्यार्थी मित्रांनो, (कोल्हापूर : सन्मित्र प्रकाशन, १९८९), पृ. १०.

५) दि.ह. सहस्रबुध्दे, शिक्षणातून नैतिक मूल्यसंवर्धन, प्र.आ. (पुणे : साधना प्रकाशन, १९८४), पृ. १५.

६) लीला पाटील, मूल्यशिक्षण, (कोल्हापूर : श्रीमती महाराणी ताराबाई अध्यापक महाविद्यालय सुवर्ण महोत्सवी प्रकाशन क्रमांक १, १९८५), परिशिष्ट १, पृ.४.

७) तत्रैव.

८) का.पा. सोनवणे (संपादक), नैतिक शिक्षण, (पुणे : शिक्षण-शास्त्र संस्था, १९८५), पृ. १६.

9) B.R. Goyal, Documents on Social, Moral and Spiritual Values in Education, (New Delhi, Publication Department, N.C.E.R.T. 1979), p. 45.

10) J.P. Naik, Policy and Performance in Indian Education, 1947-74 as quoted in 'Vidyarthee Mitranno' by R.B. Dewasthalee, (Kolhapur, Sanmitra Prakashan, 1989), p.14.

11) The Report of the University Education Commission, (1948-49), (New Delhi : Ministry of Education, 1962), p.38.

12) Swami Vivekanand, as quoted in 'Shaikshanik Tatwadnyan Va Shaikshanik Samajshastra' by M.B. Kundale, Fifth Edition, (Pune : Shree Vidya Prakashan, 1983), p.572.

१३) ग.वि. अकोलकर आणि पाटणकर ना.वि., मराठीचे अध्यापन, (पुणे : व्हीनस प्रकाशन, १९६१), पृ. ६

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR